# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र
## दिनांक 08 / 10 / 2019

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :–**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारु विक्रीयाविरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत विशेश मोहिम राबविली जात असुन या मोहि अंतर्गत दिनांक 07 / 10 / 2019 रोजी जुगार कायदया अंतर्गत पो.स्टे.बासंबा येथे (01) ठिकाणी छाप मारुन आरोपी तांच्या विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडून एकुण 11150 / – रु. सह 26.82 लीट दारु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन,आरोपीतां विरूध्द दारुबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखर करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहेत.

**चोरी** :– दिनांक 07 / 10 / 2019 रोजी फिर्यादी गजानन काळबा मोरे रा औंढा ना यांच्या फिर्यादीवरून पोस्टे औंढा ना येथे कलम 379,34 भादवी व सहकलम महसुल अधिनियम 48 (7)(8) सहकलम 50 / 177 मोवाका प्रमाणे दिनांक 07 / 10 / 2019 रोजीचे मौजे सुरेगाव पाटी येथे यातील नमुद टॅक्टर चालकाने त्याचा ताब्यातील वाहन हे अवैधरित्या रेती गौण खनिज उत्खनन करून चोरून घेवुन जात असतांना पोलीसांनी थांबविण्याचा इशारा केला असता त्याने त्याचे ताब्यातील टॅक्टर जागीच थांबवुन चावी सोडुन पळुन गेला या संदर्भात औंढा ना पोलीस तपास करीत आहेत.

**दुखापत** :– दिनांक 07 / 10 / 2019 रोजी फिर्यादी कुनाल कैलास झुंझुनवाला यांच्या फिर्यादीवरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम 323,324,504,506,34 भादवीप्रमाणे दिनांक 03 / 10 / 2019 रोजीचे संध्याकाळी 09.30 वासु मौजे देवडा नगर येथे यातील आरोपी यांनी संगणमतकरून फिर्यादीने आरोपीची बहिनीची छेड का काढली या कारणावरून डोके फोडुन रक्त काढुन जखमी केले व लाथाबुक्यांनी मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करीत आहेत.

दिनांक 07 / 10 / 2019 रोजी फिर्यादी मदन उमा चव्हान यांच्या फिर्यादीवरून पोस्टे औंढा ना येथे कलम 323,324,504भादवी प्रमाणे दिनांक 06 / 10 / 2019 रोजीचे 4.30 वासु नमुद आरोपीने फिर्यादीस तु माझी आत्या गयाबाई हिचे सोबत चांगला का वागत नाही या कारणावरून फिर्यादीस खाली पाडुन दगडाने डोक्यात मारुन जखमी केले व लाथाबुक्यांनी मारहाण केली या संदर्भात औंढा ना पोलीस तपास करीत आहेत.

दिनांक 07 / 10 / 2019 रोजी फिर्यादी गजानन नरहरी रत्नपारखी यांच्या फिर्यादीवरून पोस्टे हटटा येथे कलम 323,324,504,506,34 भादवीप्रमाणे दिनांक 07 / 10 / 2019 रोजीचे 02.30 वासु नमुद आरोपीतांनी संगणमतकरून फिर्यादीस थापड बुक्यांनीमारहाण करून विळयाने उजव्या हातावर मारुन जखमी केले व फिर्यादीचे आई व भाउ सोडविण्यासाठी आले असता त्यांना पण थापड बुक्यांनी मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली या संदर्भात हटटा पोलीस तपास करीत आहेत.

**अपघात**:– दिनांक 07 / 10 / 2019 रोजी फिर्यादी श्रीराम पंडीतराव हिके यांच्या फिर्यादीवरून पोस्टे वसमत ग्रा येथे कलम 279,337,338 भादवी प्रमाणे दिनांक 06 / 10 / 2019 रोजीचे 18.00 ते 18.30 वासु यातील फिर्यादी चे वडिल जिप क्र एमएच 26 एल 0803 च्या चालकाने त्याचे ताब्यातील जिप निष्काळजीपणाने व हयगईने चालवुन फिर्यादीचे वडिलास धडक देवुन गंभीर जखमी केले या संदर्भात वसमत ग्रा पोलीस तपास करीत आहेत.

पोलीस अधिक्षक हिंगोली
करीता